ॐ

# अध्याय पांचवा

१ ‘श्रीजनार्दना, तूं चि सांगसी सकल-कर्म-संन्यास
आणि वर्णिसी तसा मागुतीं कर्म-योग-अभ्यास १
द्विविध मार्ग हे तरी त्यांतुनी श्रेयस्कर तो दावीं
मज सुनिश्चयें एक चि देवा,’ ऐसे अर्जुन विनवी २

२ वदे श्री-पति, ‘दोन्ही होती मोक्ष-साधनीं सरिसे
कर्म-योग परि संन्यासाहुनि विशेष मानीं ऐसें ३
थोर-लहानां सामान्य जनां कर्म-योग हा सुगम
तो आचरितां कळे तत्त्वतां संन्यासाचें वर्म ४
वर्म जाणतां ज्ञान-योग-फल सहज लाभतें येथें
कर्म-योग हा असा साधकां नेई मोक्ष-पदातें ५

३ खेद न पावे जरी आघवें प्रेय सांडुनी गेलें
जया कामना मुळीं असेना मन स्व-रूपीं जडलें ६

प्रीति-द्वेष-द्वन्द्व-रहित जो तो चि नित्य संन्यासी
असा गणावा जाण पांडवा तो निर्गुण-सुख-राशी ७

अशी बाणली जया अंतरीं संन्यासाची खूण
तरी सुखें तो विमुक्त होतो कर्म-बंधनांतून ८

तया करावा न लगे वीरा धन-सुत-दारा-त्याग
असुनी देही तो चि विदेही मन होतां निःसंग ९

४ सांख्य वेगळा योग निराळा असें बोलती मूढ
म्हणती ज्ञाते एकरूप ते दोन्ही उकलुनि गूढ १०

जरी अंतरीं पुरी बाणली एक चि निष्ठा येथें
फल दोहींचें तरी पावती साधक-जन ते निरुतें ११

५ ज्ञानी मिळवी तें चि लाभतें योग्यातेंही स्थान
सांख्य योग हे एक चि पाहे तो चि जाणता जाण १२

६ योगावांचुनि कुणा न साधे सुखें कर्म-संन्यास
योग-युक्त तो ज्ञानी पावे शीघ्र ब्रह्म-पदास १३

योग-युक्ति ही न साधितां जो संन्यास करूं धांवे
कर्म-चक्रिं ह्या तयें भ्रमुनियां पुनश्च गोते खावे १४

७ मनासहित तीं सर्व इंद्रियें ठेवुनियां स्वाधीन
शुद्ध-बुद्धिनें जयें साधिला कर्म-योग संपूर्ण १५

प्राणिमात्र तें अभेद-भावें आत्म-रूप जो पाहे
करी सकलही कर्में परि तो अलिप्त करुनी राहे १६

जाण तयाचा देह-भाव तो समूळ विलया गेला
म्हणुनि जाहला करुनि अकर्ता जरि तो देही दिसला १७

८ पाहे नेत्रीं ऐके श्रोत्रीं स्पर्शासि तरी जाणे
करी भोजना चाखुनि अन्ना परिमळ सेवी घ्राणें १८

बोले चाले श्वासोच्छ्वासहि करी चि घेई टाकी
वेळीं झोंपें सुखें पापणी उघडी आणिक झांकी १९

९ परि 'मी कर्ता' अशी अहंता तया योग-युक्तातें
अल्प हि न शिवे म्हणुनी पावे ज्ञानें नैष्कर्म्यातें २०

आणि इंद्रियें सेविती स्वयें आपआपुले अर्थ
जाणुनियां हें अलिप्त राहे होउनि साक्षीभूत २१

१० संग सोडुनी करि जो कर्में ब्रह्मार्पण-बुद्धीनें
पापें नर तों लिप्त न होतो जैसें कमल जलानें २२

११ अंतःशुद्धिस्तव ते योगी सोडुनियां आसक्ति
देहेंद्रिय-मन-बुद्धिद्वारा केवल कर्में करिती २३

१२ फलाभिलाषा त्यजुनी योगी परम शांति मेळवितो
फलासक्त तो अयुक्त कामें कर्म-बंधनीं पडतो २४

१३ सर्व हि कर्में मनें त्यजुनियां सुखें संयमी राही
नव-द्वार-युत शरीरांत ह्या करी न करवी कांही २५

१४ जगत्प्रभु रची नच लोकांचीं कर्में न च कर्तृत्व
कर्म-फलाची जोड हि न रची वर्ते माया-तत्त्व ! २६

१५ तो परमात्मा न घे कुणाचें दुष्कृत अथवा सुकृत
जसें करावें तसें भरावें असा कर्म-सिद्धान्त २७

मनीं अहंता धरुनी 'कर्ता ईश्वर' ऐसें म्हणती
आणि लाविती निज-कर्माचा दोष तया मूढ-मती २८

मोह पावले अज्ञान-बळें जयें वेढिलें ज्ञान
म्हणुनि नेणती परमात्म्याचें अकर्तृत्व-विंदान २९

सत्य लेखिती अशी वदन्ती 'उत्पत्ति-स्थिति-नाश
स्वयें चि करितो सर्व-व्यापी परमात्मा जगदीश.' ३०

जाण अर्जुना, प्रपंच-रचना हा मायेचा खेळ
आत्मा केवळ अलिप्त निर्मळ निरुपाधिक चोखाळ ३१

१६ आत्म-ज्ञानें असें जयांचें हारपलें अज्ञान
तयां प्रकटवी पर-तत्त्वातें रवि-सम तें चि ज्ञान ३२

जशी उजळतां पूर्व दिशा ती दिशा उजळती दाही
आत्मानुभवें तयां स्वभावें विश्वीं न दुजें कांहीं ३३

जिथे पहावें तिथे दिसावें आत्म-रूप जगतांत
आत्म-रूपता अशी प्रकटतां रंगुनि जाती त्यांत ३४

१७ अखंड पार्था, वृत्ति रंगली अशी स्व-रूपीं ज्याची
तन्मयतेनें बुद्धि चाखिते गोडी ब्रह्म-रसाची ३५

एक चि आत्मा भरुनि राहिला विश्वीं निष्ठा ऐसी
आत्म-परायण रात्रं-दिन जे विसरुनि भिन्नत्वासी ३६

आत्म-ज्ञानें पाप जयांचें धुउनी गेलें सारें
न लागती त्यां पुन्हां फिरावे जन्म-मृत्युचे फेरे ३७

१८ विद्या-विनयान्वित ब्राह्मणीं गजीं गो-धनीं श्वानीं
श्व-पचीं हि तसा आत्मैक्याचा अनुभव घेती ज्ञानी ३८

सांग ठाऊका असे कधीं का सूर्यातें अंधार
भेद-भावना तशी उरे ना होतां एकंकार ३९

१९ सर्वत्र सदा सम अद्वय तें निर्मळ पूर्ण ब्रह्म
आत्म-समरसें असें जाणती सम-दृष्टीचें वर्म ४०

शरीर-धारी तरी तयांनीं जिंकिला चि संसार
रतले ब्रह्मीं नर जे करुनी सारासार-विचार ४१

साम्यावस्था अशी पावतां जरी राहिला देह
तरी जाण ते आत्म-द्रष्टे ब्रह्म चि निःसंदेह ४२

२० प्रियें न हर्षे अप्रिय-लाभें न होय शोकाधीन
मोह-रहित तो स्थिर-बुद्धि असा ज्ञानी ब्रह्मीं लीन ४३

२१ विषयीं विटला स्व-सुख पावला अंतरीं चि जो योगी
तन्मय होतां ब्रह्म-पदीं तो अक्षय सुख उपभोगी ४४

२२ विषय-सुख चि तें कारण होतें निज दुःखातें अंतीं
क्षणीं जन्मतें आणि लोपतें सुज्ञ न तेथें रमती ४५

परी भुकेला जसा भिकारी तुष हि प्रेमें भक्षी
विषय-सेवनीं नर अज्ञानी तैसें सुख संलक्षी ४६

तृषार्त मृग तो जसा धुंडितो जलार्थ माळ-जमीन
अज्ञ धांवतो तसा होउनी विषय-सुखीं तल्लीन　४७
कामी-जन तो विषय-कर्दमीं रुतुनी जाई वायां
कशी मूषका शीतल होइल सर्प-फणीची छाया ?　४८
गळीं लाविलें आमिष न गिळी मीन तोंवरी गोड
म्हणुनि मानवें नच पुरवावें विषय-सुखाचें कोड　४९
स्व-सुख नेणती म्हणुनी भ्रमति रमती विषयीं अ-मति
विषय-सेवनाविना तयांना करमेना ह्या जगतीं　५०
भोग-जळींचे जळ-चर साचे ते चि लोळती विषयीं
पूय-पंकिंचे किडे उकिरडां चिळसी घेती काई ?　५१
विष-सम विषयां त्यजुनियां जगीं जसा वावरे संत
आत्म-ज्ञानीं आस्था धरुनी वाग तूं हि लोकांत　५२
२३ मरणापूर्वी इथें चि काम-क्रोधोद्भव-आवेग
जिरवूं शकतो सुखी पुरुष तो तयें साधिला योग　५३
स्व-सुखीं रमतां देह-अहंता पूर्ण लोपुनी जाय
म्हणुनी ज्ञाता विषय न सेवी ह्यांत नवल तें काय !　५४
स्व-सुख भोगणें वेगळेपणें हें हि न उरतें तेथें
भोग्य-भोगिता-भोग सर्व तें एकरूपते येतें　५५
द्वैत लोपतां एकात्मकता स्वभावतां जी आहे
अनिर्वाच्य ती खूण पावती स्वानुभवी लवलाहें　५६

२४ निज-प्रकाशें जयां जग दिसे ब्रह्म-रूप संपूर्ण
योगी-जन ते पावती इथे सुखें ब्रह्मनिर्वाण ६७

असे मातले बुडुनी गेले महा-सुखाच्या डोहीं
मूर्तिमंत ते संत सर्वथा ब्रह्म चि ऐसें पाहीं ! ५८

२५ दोष निमाला ज्ञानें नुरला संशय ज्यांच्या चित्तीं
रत विश्व-हितीं सर्वां भूतीं आत्म-भाव जे धरिती ५९

तसें स्वभावें स्व-वश जाहलें मन हि जयांचें पूर्ण
संयमी ऋषी पावती चि ते येथें पद निर्वाण ६०

२६ आत्म-ज्ञानी निष्काम यती स्वाधीनान्तःकरण
क्रोध-रहित जे सर्वत्र तयां असे ब्रह्म-निर्वाण ६१

योगी-जन तो कसा पावतो ह्या देहीं चि ब्रह्म
ऐक भारता, तुज सांगतसें संक्षेपें तें वर्म ६२

२७ इडा-पिंगला आणि सुषुम्ना तिन्ही जेथें मिळती
भ्रु-युग-मध्य-स्थानिं ठेवुनी स्थिर नासाग्रीं दृष्टी ६३

सारुनि परते शब्दादिक ते इंद्रिय-विषय समग्र
प्राणायामें हृदयाकाशीं करुनी मन एकाग्र ६४

२८ जयें साधिला मनोलय असा पवनद्वारा गगनीं
मोक्ष लक्षुनी तृष्णा-भीति-क्रोधरहित होवोनी ६५

मन-बुद्धीसह इंद्रिय-वृत्ती रिगतां चि महा-शून्यीं
तो चि पावतो संयमी मुनी जीवन्मुक्ति निदानीं ! ६६

२९ यज्ञीं हविलें, जें जें पावे तें तें मज संपूर्ण
तप-सामुग्री जोडिली हि ती होते मजलागून ६७

यज्ञ-तपाचा भोक्ता साचा मी चि एकला जाणें
सर्वेश्वर मी लोक-स्वामी अनुभव ऐसा बाणे ६८

अलिप्त असूनी प्राणि-गणासी माझें चि अधिष्ठान
आणि सर्वथा मी सर्वांचा सखा सोयरा प्राण ६९

ध्यान-बळें हें स्वरूप माझें असें जाणुनी योगी
नित्य समाधि-मग्न राहुनी परम शांति-सुख भोगी ७०

ध्यान-धारणा अशी अर्जुना, तुज कथिली संक्षिप्त
विस्तृत पुढतीं अतां ऐक ती होउनि सावध-चित्त.' ७१

येथें भावार्थ गीतेचा पंचमाध्याय संपला ।
साकल्यें कर्म-संन्यास-योग ह्यांत निवेदिला ॥ ५ ॥